संचालनालय आणि अधिनस्त विभागीय सहसंचालक कार्यालयातील एकूण २०५ पदे बाह्य यंत्रणेमार्फत पुरविण्यासंबंधाने प्रसिध्द केलेल्या दिनांक २८/०३/२०१८ रोजीच्या निविदा सुचनेच्या अनुषंगाने निविदा पूर्व बैठक दिनांक १०.०४.२०१८ रोजी संचालनालयात सकाळी ११:३० वाजता बैठक सभागृहामध्ये आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये उपस्थित केलेले मुद्दे आणि घेतलेले निर्णय खालीलप्रमाणे.

सदर बैठकीस खालील अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

१. सहसंचालक (प्रशासन) - श्री.विकास देसाई
२. उपसंचालक (प्रशासन) - श्री. रत्नराज जवळगेकर
३. लेखा अधिकारी (प्रशासन) - श्रीम. अनुजा सावंत
४. सहाय्यक लेखा अधिकारी (प्रशा) - श्रीम. मनिषा देशपांडे
५. एकूण १३ संस्थांचे प्रतिनिधी

| अ.क्र. | मुद्दा | निविदाकारांची मागणी | निर्णय |
|---|---|---|---|
| १ | किमान वेतन कायद्या नुसार वेतन राज्याचे दर विचारात घेण्यात यावेत कि केंद्र शासनाचे दर विचारात घेण्यात यावेत. | श्री. अभय शिंदे, देव मामलेदार संस्था यांनी या बैठकीमध्ये Minimum wages हे राज्य शासनाप्रमाणे असतील की केंद्र शासनाप्रमाणे असतील असा प्रश्न उपस्थित केला. | मा. सहसंचालक साहेबांनी आपल्याला कर्मचारी फक्त महाराष्ट्रापुरते पाहिजे असल्याने आपले Minimum wages हे राज्य शासनाच्या नियमानुसार असतील असे सुचविले. राज्य शासनाचे नियम काही बाबतीत Slient असल्यास केंद्र शासनाचे नियम लागू राहतील. |
| २ | Tender जिल्हानिहाय Arrange करावे | श्री. शैलेंद्र घाडगे, श्री कन्सलटंसी यांनी बैठकीमध्ये आपले Tender जिल्हा वाईज Arrange करावे जणेकरुन त्यांना व संचालनालयास ते सोईचे होईल असे सुचविले. | मा. सहसंचालक यांनी Tender हे विभाग निहायच काढले जातील असे बैठकीमध्ये सांगीतले व ते सर्वांनी मान्य केले. सदर संस्थेने त्यांचे मुद्दे लेखी देण्याचेही कबूल केले. |
| ३ | एखाद्या कर्मचाऱ्याने राजीनामा दिला / काम सोडून गेला तर | | आपल्याला होतकरु, हुशार आणि अनुभवी लिपीक वर्गीय कर्मचारी पाहिजे असल्याने कांही कारणास्तव जर एखाद्या कर्मचाऱ्याने राजीनामा दिला किंवा काम सोडून गेला तर तात्काळ त्या जागेवर दुसरा कर्मचारी पुरविण्याची जबाबदारी ही पूर्णपणे संस्थेचीच असेल. इतर संबंधित तरतुदी निविदेमध्ये नमुद आहेत. |
| ४ | कामाचा अनुभव | सर्वच संस्थांच्या प्रतिनिधींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या आदेश हे त्या जाहिरातीत नमुद | याअनुषंगाने सहसंचालक यांनी प्रतिनिधींशी चर्चा करताना संचालनालयास लिपीक वर्गीय |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असलेल्या पदांसाठी एकत्रित पणे देण्यात येतात जसे ज्युनियर इंजिनियर, संगणक ऑपरेटर, लेखा लिपीक, इ. त्यामुळे फक्त लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांची वर्क ऑर्डर अपलोड करणे शक्य होणार नाही. | कर्मचारी आवश्यक असल्याने संस्थेने त्यांचेकडील आदेश अपलोड करावेत. अपलोड केलेल्या आदेशातील लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेण्यात येईल. तसेच कर्मचारी लिपीक वर्गीय पाहिजे असल्याने त्याचा लिपीक वर्गाचाच अनुभव असणे आवश्यक आहे असे सहसंचालक यांनी सांगीतले व ते सर्वांनी मान्य केले. |
| ५ | इएमडीचे अनुषंगाने काही संस्थांच्या प्रतिनिधींनी चर्चा केली. | सर्व विभागासाठी इएमडी ची रक्कम रु.२ .०० लक्ष असून विभागासाठी रु.५० हजार आहे. तर त्यानुसार काही विभागांसाठी अथवा एकाच विभागासाठी टेंडर भरावयाचे असल्यास निविदा फि किती भरावी लागेल. | एका विभागासाठी इएमडी रु.५० हजार असून त्यानुसार विभागनिहाय इएमडी भरावी लागेल असे सहसंचालक यांनी सांगितले. |
| ६ | विभागात संस्थेचे कार्यालय असणे आवश्यक आहे | कांही संस्थांच्या प्रतिनिधींनी संस्थेचे कार्यालय विभागातच असणे आवश्यक आहे का? याबाबत विचारणा केली. सदर प्रतिनिधींनी याबाबत असे प्रतिपादन केले की, काही संस्थांची कार्यालये जिल्हास्तरावर असून विभागाचे मुख्यालयी नाही. तरी अशा संस्था निविदा प्रकियेत भाग घेऊ शकतील का? | निविदा भरणाऱ्या संस्था ज्या विभागासाठी निविदा भरणार आहेत त्या विभागात अथवा त्या विभागातील जिल्ह्यात संस्थेचे कार्यालय असणे आवश्यक आहे असे मा. सहसंचालक यांनी सांगितले व ते सर्व प्रतिनिधींनी मान्य केले. |
| ७ | निविदेत भरण्यात येणारा सर्व्हिस चार्ज बाबत चर्चा करण्यात आली. | या अनुषंगाने यशपाल संस्थेच्या प्रतिनिधींनी खालील मुद्दा मांडला. "काही संस्था फायद्यासाठी अशा रकमा शुन्य किंवा पैशात टाकतात व त्या संस्था जर न्युनतम दरधारक ठरल्यास त्यांचे आयकर वजाती कशा पध्दतीने करण्यात येणार " तसचे यासाठी बेसिक रेट ठरविण्यात यावा अशी मागणी मांडण्यात आली. | सर्व्हिस चार्जेस योग्य प्रमाणात असणे आवश्यक आहे. त्याचे प्रमाण संचालनालयाकडून निश्चित करण्यात येणार नाही. परंतू त्याचे प्रमाण योग्य आहे किंवा नाहि याबाबत खात्री करण्यात येवुन अशा प्रकारच्या निविदा प्राप्त झाल्यास त्या नाकारण्याचा अधिकार संचालनालनास आहे. |
| ८ | ई.एस.आय. प्रमाणपत्राबाबत | श्री. पेंढारकर, दत्त दिगंबर संस्था यांच्या मते लातूर उस्मानाबाद जिल्हा हे | उपसंचालक, प्रशासन व सहसंचालक, प्रशासन यांनी जर लातूर, उस्मानाबाद हे दोन जिल्हे औद्योगीक क्षेत्रात येत |

| | | | |
|---|---|---|---|
| | | औद्योगीक क्षेत्रात येत नसल्याने त्यांना विम्याची अट लागू नाही असे सुचविले व त्यांनाअ औरंगाबाद आयुक्तां कडून तसे पत्र देण्यात आल्याचे सांगितले. परंतू काही प्रतिनिधींच्या मते अशा ठिकाणी "Workman Policy" घेणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आंले. | नसतील, तर त्यांना विम्याची अट लागू नसेल आणि त्यांच्याकडे औरंगाबाद आयुक्त यांनी ई.एस.आय. प्रमाणपत्र दिले असेल तर त्यांना विम्याची सुट देण्याचे सदर बैठकीमध्ये मान्य केले. ज्या जिल्ह्यांचा औद्योगिक क्षेत्रात समावेश आहे अशांनी ईएसआय करिता आवश्यक असणारे प्रमाणपत्र अपलोड करावे. तसेच ज्या जिल्ह्यांचा औद्योगिक क्षेत्रात समावेश होत नाही, त्यांनी "Workman Policy" लागू असल्याचे प्रमाणपत्र अपलोड करावे, असे सहसंचालकांनी बैठकीत सांगितले. |
| ९ | कर्मचाऱ्याच्या वेतनाच्या बाबतीत | कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या बाबतीत कोणते निकष लावण्यात यावे असे कांही संस्थाचे होते कारण कांही संस्था D.A./ Holiday/ Leave इत्यादी त्या कर्मचाऱ्यास लागू करत नाहीत. | कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या बाबतीत किमान वेतनाचा निकष लागू करण्यात येईल व त्यांचे ३० दिवसाच्या हिशोबाने वेतनाची परिगणना केली जाईल आणि सदर कर्मचाऱ्यांसाठी किमान वेतन कायद्यानुसार वेतन व त्याअनुषंगिक DA, HRA, PF, BONUS, LEAVE, HOLIDAY, LWP यांचा समावेश असावा असे प्रतिनिधींनी सांगितले. त्यानुसार निविदेच्या रकमा भरण्यात याव्यात असे मा. सहसंचालक, प्रशासन यांनी सांगीतले व ते सर्वांनी मान्य केले. |
| १० | पारिश्रामिक देताना झोन निहाय देण्यात यावेत किंवा कसे याबाबत चर्चा करण्यात आली. | सुमित फॅसिलिटीज या संस्थेच्या प्रतिनिधींनी खालील मुद्दे बैठकीत मांडले.<br>१. देण्यात येणारे मनुष्यबळ विभागीय स्तरावर उपलब्ध करुन द्यावयाचे आहे की जिल्हास्तरावरही उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत.<br>२. तसेच निविदा भरताना झोन प्रमाणे भरण्यात यावित किवा विभागाचे दरानुसार भरण्यात यावीत याबाबत चर्चा केली. | सहसंचालक महोदयांनी याबाबत विचारणा केली असता ३ झोन असून महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषद या नुसार वेतन निश्चित होते असे सांगण्यात आले. यामुळे वेतनाचे दरामध्ये फरक येतो. तसचे यावर सदर संस्थेचे प्रतिनिधीनीं सरासरी प्रमाण नुसार दर भरण्यात यावेत अशी मागणी केली. तथापी सहसंचालक यांनी दर भरताना विभागनिहाय भरण्यात यावेत असे सांगितले. तसचे पुरविण्यात येणारे मनुष्यबळ विभाग / जिल्हा स्तरावरील कार्यालयात कार्यरत असेल असेही सांगितले. |
| १० | किमान वेतन | देवमामलेदार व श्री कंन्सलटंसी | या मुद्याचे अनुषंगाने सहसंचालक यांनी |

| | | | |
|---|---|---|---|
| | कायद्यापेक्षा कमी वेतन देण्याबाबत | यांनी किमान वेतन कायद्यापेक्षा कमी वेतन /पारिश्रामिक दिले जाते असा मुद्या चर्चेत उपस्थित केला. | पुढील महिन्याचे वेतन अदा करण्यापुर्वी कर्मचाऱ्याचे खात्यात मागिल महिन्याचे वेतन अदा केल्याचा पुरावा म्हणून इसीएस केल्याची स्लिप व बँक स्टेटमेट असणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच अशी घटना आढळून आल्यास लेखी निवेदन सादर केल्यास अशा संस्थेवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे संस्थेच्या प्रतिनिधींना सांगितले. |
| ११ | प्रोप्रायटरशीप असल्यास निविदा भरता येईल का | प्रोप्रायटरशीप असल्यास निविदा भरता येईल का याबाबत चर्चा करण्यात आली. | प्रोप्रायटरशीप असल्यास निविदा भरता येणार नाही असे सहसंचालक यांनी सांगितले |
| १२ | ऑफीसचा भ्रवणध्वनी व्यस्त लागणे आणि टेंडरबाबत कांही अडचणी असल्यास संपर्क साधणे | कांही संस्थाचे असे म्हणने आहे की, ऑफीसचा भ्रमणध्वनी सारखा व्यस्त असतो अशा वेळी आम्ही कोणाकडे संपर्क साधावा किंवा टेंडर बाबत कांही अडचणी असल्यास दूसरा हेल्पलाईन नंबर देण्यात यावा अशी मागणी केली. | सहसंचालक,प्रशासन यांनी Tender च्या बाबतीत कांही अडचणी असल्यास श्रीम. अनुजा सावंत, लेखाअधिकारी व श्रीम.मनिषा देशपांडे, सहाय्यक लेखा अधिकारी यांना त्यांचे भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा असे सर्व संस्थेच्या अधिकारी वर्गाना बैठकीमध्ये सांगीतले. व त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक सर्व प्रतिनिधींना देण्यात आले. यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानण्यात येवून बैठक समाप्त करण्यात आली. |

Desai
सहसंचालक ( प्रशासन )
संचालनालय , लेखा व कोषागारे
मुंबई